MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई–४००००५.
**दूरध्वनी :** ०२२ – २२१६ ३९६४ / ६५ / ६९ **फॅक्स :** ०२२–२२१६ ३९७६
**ई–मेल :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेतस्थळ :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

जाहिरात क्र.१४/२०१८–१९

## जाहीर सुचना
## (सन २०१५ चे प्रकरण क्र.८४)

**आयोगाने सन २०१४ च्या प्रकरण क्र. १२७ मध्ये दिलेल्या आदेशातील निर्देशांच्या पूर्ततेच्या संबंधात, जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. ने सन २०१५ च्या प्रकरण क्र. ८४ अंतर्गत दाखल केलेल्या याचिकेवर, आणि वीज खरेदी कराराच्या (इपीए) कालावधीच्या समाप्तीनंतरच्या तत्सम प्रकरणांच्या हाताळणी संबंधातील चर्चा पत्रिकेवर अभिप्राय मागविण्याबाबत**

१. आयोगाने दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिलेल्या आदेशातील निर्देशांच्या पूर्ततेकरिता दिनांक १८ जून, २०१५ रोजी जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. (जेएसएसएसकेएल) यांनी सन २०१५ च्या प्रकरण क्र. ८४ अंतर्गत याचिका दाखल केली होती.

२. या याचिकेमध्ये, जेएसएसएसकेएल यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) यांच्याशी झालेल्या सुरुवातीच्या १३ वर्षांच्या वीज खरेदी कराराच्या कालावधीच्या समाप्तीनंतर, आणखी ७ वर्षांकरिता वीज खरेदी करार (इपीए) कार्यान्वित करण्यासाठी आयोगाची परवानगी मागितली होती. वीज खरेदीकरिता एकमताने झालेल्या दराची रचना खालीलप्रमाणे आहेः

**रू./ केडब्लुएच**

| १(आर्थिक वर्ष १४–१५) | २(आर्थिक वर्ष १५–१६) | ३(आर्थिक वर्ष १६–१७) | ४(आर्थिक वर्ष १७–१८) | ५(आर्थिक वर्ष १७–१८) | ६(आर्थिक वर्ष १९–२०) | ७(आर्थिक वर्ष २१–२२) |
|---|---|---|---|---|---|---|
| ४.४८ | ४.५० | ४.५२ | ४.५४ | ४.५७ | ४.५९ | ४.६२ |

३. आयोगाने दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजीच्या दैनिक आदेशात 'जेएसएसएसकेएल'च्या विद्युत संयत्रामधून निर्माण झालेल्या विजेच्या विक्री आणि खरेदीसाठी महावितरणच्या वीज दर आदेशात आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे सरासरी वीज खरेदी खर्च (एपीपीसी) दराने अंतरिम मंजुरी दिली होती.

४. आयोगाने यापूर्वी पारित केलेल्या वेगवेगळ्या वीज दर आदेशांमधून ऊसाच्या चिपाडांवर आधारित सहनिर्मिती प्रकल्प, बायोमासवर आधारित विद्युत प्रकल्प आणि पवन ऊर्जा प्रकल्पांच्या संबंधात वीज दर निश्चित केले आहेत आणि इपीएची तत्वे ठरविली आहेत. तथापि, इपीए कालावधीच्या समाप्तीनंतर लागू असलेल्या वीज दरात तंत्रज्ञानाच्या प्रकारावर अवलंबून लक्षणीय फरक आहे. त्यामुळे आयोगाने इपीए कालावधीच्या समाप्तीनंतर वीज दराच्या निश्चितीकरणासाठी विविध समस्या आणि तत्वांचे विश्लेषण केले आहे आणि आयोगाने तयार केलेल्या चर्चा पत्रिकेत वीज दर लागू करावयासाठी तीन पर्याय विचारात घेण्यात आले –जसे की, अ) पर्याय–१ : एपीपीसी, ब) पर्याय–२ : परिचालन खर्चाच्या वसुलीवर आधारित वीज दर आणि क) पर्याय–३ : पारदर्शक स्पर्धात्मक प्रक्रियेच्या माध्यमातून उचित कमाल वीज दरासह मिळालेला वीज दर. 'जेएसएसएसकेएल'ची याचिका आणि चर्चा पत्रिका आयोगाच्या www.merc.gov.in / www.mercindia.org.in या संकेत–स्थळावर उतरवून घेण्याच्या नमुन्यात उपलब्ध आहेत.

५. आयोग सदर याचिका आणि चर्चा पत्रिकेवर दि. १५ जून, २०१८ रोजी किंवा त्यापूर्वी अभिप्राय, सूचना आणि हरकती लेखी मागवित असून त्या सहा (१ + ५) प्रतींमध्ये आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई– ४००००५ येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई–मेल फॅक्सः ०२२– २२१६३९७६ ई–मेलः– mercindia@merc.gov.in द्वारा या पत्त्यावर पाठवाव्यात.

६. सूचना व हरकती **पाठविणाऱ्या** व्यक्तिस आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर ते देखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला, आयोगाकडून, शुक्रवार, **दि. १५ जून,** २०१८ **रोजी सकाळी ११.०० वाजता, आयोगाच्या १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई,** ४००००५ या पत्त्यावरील कार्यालयात आयोजित करण्यात येणाया जाहीर सुनावणींच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**मुंबई**
**दिनांक : १५ मे, २०१८**